# एकलव्य आर्थिक साहाय्य योजना [ योजनांतर्गत योजना ]

**प्रस्तावना:**

सदरची योजना महाराष्ट्र राज्य, शासनाकडून राबविली जाते. प्रत्यक्षात या योजनेवरील कार्यवाही शिक्षण संचालक [उच्च शिक्षण ] महाराष्ट्र राज्य पुणे -१ यांचेकडून केली जाते. ही योजना शासन निर्णय क्र.१०९५[८१] मशि-४ दि. ७ फेब्रुवारी १९९६ अन्वये राज्य शासनाने सुरू केलेली आहे.या योजनेची कार्यवाही सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्षात आलेली आहे.

राज्यातील पदवी अभ्यासक्रमानंतर होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पुर्ण करता यावे या उदात हेतूने सदरची योजना सुरू केलेली आहे. या योजनेमुळे पदवीनंतर गरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यास निश्चितच मदत होते. या योजनेबाबतच्या अटी व नियम याबाबतच तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१) योजनेचे नाव :- **एकलव्य आर्थिक साहाय्य योजना**

२) संच संख्या:- या योजनेकरीता विहित संच निश्चित केलेले नाहीत. तथापि,राज्य शासनाने प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये मंजूर केलेल्या तरतुदीच्या रकमेस अधिन राहून विद्यापीठनिहाय प्राप्त झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. सर्वसाधारण प्राप्त तरतुदीच्या अनुषंगाने १००० ते १२०० लाभार्थी या योजनेचा फायदा घेत असल्याचे आढळून आलेले आहे.

३) शिष्यवृत्तीचा दर :- पात्र ठरणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांना वार्षिक रू ५०००/- इतकी शिष्यवृत्ती {वार्षिक } मंजूर केली जाते.

४) पात्रता:-

**अ)** विधी,वाणिज्य व कला शाखेमध्ये किमान ६०% व विज्ञान शाखे्करीता किमान ७०% पदवी अभ्यासक्रमामध्ये गुण प्राप्त करणारे विद्यार्थी.

**ब)** ज्याचे किंवा ज्याच्या पालकांचे वार्षिक रू ७५,०००/- (शा.नि. ५/२/२००४ नुसार सुधारीत दर ) पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी.

**क)** सदर उत्पन्नाचे प्रमाणप्रत्र हे संबंधित तहसिल कार्यालयाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

**ड)** सदर विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक.

**ई)** संबंधित विद्यार्थ्यांने कोठेही पुर्ण किंवा अर्धवेळ नोकरी स्वीकारल्यास तो या शिष्यवृत्तीस पात्र ठरत नाही.

५) अर्ज कोठे मिळतो:- मागील वर्षाचा खर्च विचारात घेवून त्या प्रमाणात विद्यापीठनिहाय शिष्यवृत्तीचे आवेदनपत्र शिक्षण संचालनालय [ उच्च शिक्षण ] महाराष्ट्र राज्य, पुणे -१ याचे कडून पाठविले जातात. तसेच कमी जास्त प्रमाणात आवश्यकता असल्यास संबंधित विद्यापीठ/महाविद्यालये प्राचार्य यांचेकडून लेखी स्वरूपात मागणी केल्यास संबंधिताना आवेदनपत्र पाठविले जातात.

६) अर्ज कोणमार्फत,कोणाच्या नावे पाठवावा: राज्यातील सर्व विद्यापीठाना तसेच मा्गणीनुसार संबंधित महाविद्यालयांना पाठविलेली शिष्यवृत्तीची आवेदनपत्रे त्या त्या संबंधित विद्यापीठ/महाविद्यालयाकडून शिक्षण संचालक { उच्च शिक्षण } महाराष्ट्र राज्य पुणे -१ यांचेकडे सादर केली जातात.

